CMYK

बीड । बुधवार

१८.१२.२०२४

वर्षे : ४ अंक : २५१

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

●dailymarathwadapatra2021@gmail.com ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post:Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●Mo. 9822152955




# सरपंच हत्या प्रकरणात मोठा ट्विस्ट

## मारेकरी आणि PSI राजेश पाटलांची हॉटेलमध्ये भेट, Video व्हायरल



**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंत संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेनं संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर जिल्ह्यात वातावरण चांगलंच तापलं, केज आणि मस्साजोग येथे आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी आंदोलन केलं..

दरम्यान या प्रकरणात संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात त्यांच्या कुटुंबीयांनी पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केलेला असतानाच एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. मात्र हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असला तरी हा व्हिडीओ नेमका कधीचा आहे, याबाबत कुणीही माहिती दिलेली नाही.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला आठ दिवस होते. या प्रकरणात पोलिसांची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप पीडित कुटुंबाने केला होता. त्याच अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांचे चार दिवसापूर्वीच निलंबन करण्यात आले आहे. पीएसआय राजेश पाटील आणि या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले हे केज शहरातील बसंत बिहार उडप्पी हॉटेलमध्ये भेटले. त्याचाच सीसीटिव्ही व्हिडीओ आता व्हायरल झाला आहे.

### ● केज पोलीस निरीक्षकांना सक्तीच्या रजेवर

सरपंच देशमुख खून प्रकरणात हलगर्जीपणाचा ठपका ठेवत केज पोलीस निरीक्षकांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. बीड सरपंच हत्या प्रकरणात अपहरणानंतर ३६ फोन पोलिसांना केले होते मात्र पोलीस ३ तास मजा बघत होते, असा आरोप करण्यात आला होता. या संपूर्ण प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेबद्दल असलेला संशय पाहता केज पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक राजेश पाटील यांना निलंबित केल्यानंतर पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनाही सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. मस्साजोग येथून सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्यानंतर केज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.

### ● एकूण तीन आरोपींना अटक

मस्साजोग प्रकरणात सध्या एकूण तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आणखी चार आरोपी अटक करायचे बाकी आहेत लवकरच त्या आरोपींनाही अटक केले जाईल. पथके वेगवेगळ्या ठिकाणी गेलेले आहेत. पीएसआय पाटील यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. महाजन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलेला आहे. जिल्हावाशीयांना आवाहन आहे रस्त्यावर उतरून सर्वसामान्यांना त्रास देण्याचे प्रकार करू नये अन्यथा गुन्हा दाखल केला जाईल, असं पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी सांगितलं.

# "सिगरेटच्या लायटरनं त्याचे डोळे जाळले, मृतदेहावर उड्या मारल्या",

## विरोधी पक्षांकडून बीड घटनेचा निषेध करत सभात्याग!



**मुंबई । प्रतिनिधी**

बीड व परभणीतील घटनांचे पडसाद आज विधानसभेत उमटल्याचं पाहायला मिळालं. चर्चेला अध्यक्षांनी नकार दिल्यानं विरोधकांनी सभात्याग केला.

महाराष्ट्रात एकीकडे सत्ताधारी पक्षांमध्ये कुणाला मंत्रीपद मिळालं, कुणाला नाकारलं याची चर्चा असताना दुसरीकडे विरोधी पक्षांकडून बीड आणि परभणीमधील घटनांवरून सरकारला जाब विचारला जात आहे. नागपूर हिवाळी अधिवेशनाचा आज दुसरा दिवस असून या दोन्ही घटनांवर सभागृहात सविस्तर चर्चा व्हावी, अशी मागणी विरोधकांनी केली. मात्र, ही मागणी मान्य न झाल्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना काँग्रेस आमदार व माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी या दोन्ही घटनांवरून देवेंद्र फडणवीस सरकारवर हल्लाबोल केला. तसेच, विरोधी पक्षांचे नेते या दोन्ही ठिकाणचा दौरा करणार असल्याचंही ते म्हणाले.

▶▶ उर्वरित पान २ वर

### ● याचा अर्थ दाल में कुछ काला है

आम्ही अधिवेशनात याची मागणी करतोय, मग सरकार यावर का घाबरतेय. तातडीनं चर्चेसाठी तयार का होत नाहीये? याचा अर्थ दाल में कुछ काला है. सरकार दलितांवरील अत्याचारांकडे डोळे झाकून दुर्लक्ष करू इच्छित आहे. कुणी मरो, वाचो याचं काहीही देणंघेणं सरकारला नाहीये, अशा शब्दांत विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला.

# सरपंच हत्याप्रकरणी आ.संदीप क्षीरसागर आक्रमक

## अधिवेशन संपण्यापूर्वी 'मास्टरमाईंड' ला अटक न झाल्यास जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल




**नागपूर । प्रतिनिधी**

मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या अपहरण प्रकरणात आ.संदीप क्षीरसागर सातत्याने आक्रमक भूमिका घेत प्रकरणाचा मास्टरमाईंड समोर आणण्याची मागणी करत आहेत. यातच नागपूर येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या सत्रातही आ.क्षीरसागर यांनी या गुन्ह्यातील सर्व आरोपी आणि मास्टरमाईंड वाल्मीक कराड ला अटक करण्याची मागणी केली.

मंगळवारी (दि.१७) रोजी विधीमंडळ अधिवेशनाच्या दुसर्या दिवशी सकाळच्या सत्रात आ.संदीप क्षीरसागर यांनी केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या निघृण हत्या प्रकरणावर आक्रमकपणे प्रश्न उपस्थित केले. स्व.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात करता करविता हा वाल्मीक कराड आहे. परंतु तपासाची दिशा बदलविण्याकरीता आणि प्रकरणावरील लक्ष विचलित करण्यासाठी त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे. स्व.देशमुख यांच्या अपहरण आणि हत्या प्रकरणात वाल्मीक कराड हाच मास्टरमाईंड आहे, हे संपूर्ण जिल्ह्याला माहीत असताना अपहरण आणि खूनाच्या प्रकरणातून नाव वगळण्यात आले आहे. त्यामुळे या गुन्ह्यातील मास्टरमाईंड वाल्मीक कराड ला अधिवेशन संपण्यापूर्वी अटक करा अन्यथा जिल्ह्यातील जनतेचा प्रचंड रोष आहे, आणि त्या रोषाला, सत्ताधाऱ्यांना सामोरे जावे लागणार असल्याचे सांगितले.

▶▶ उर्वरित पान २ वर

## राज्यात सुरु असलेल्या, प्रस्तावित प्रकल्पांना 'एडीबी'ने मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य करावे : मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्याच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि गतिमान विकासासाठी 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉरमेशन'च्या (MITR 'मित्रा') माध्यमातून आरोग्य, ग्रामीण रस्ते वाहतूक, कौशल्य विकास आणि बांबू प्रकल्प या क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. या प्रकल्पांची गती वाढविण्यासाठी राज्यात सुरु असलेल्या आणि प्रस्तावित असलेल्या प्रकल्पांना आशियाई विकास बँकेने (उड्ढ) मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँकेला केले आहे. 'एडीबी'च्या संचालक



मिओ ओका यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर विधानभवन परिसरातील मंत्रिमंडळ सभागृहात आशियाई विकास बँकेसंदर्भातील विविध विषयांबाबत बैठक झाली. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्याच्या विकासासाठी ग्रामीण भागाचा वेगाने विकास होणे गरजेचे आहे. त्यामुळे रस्त्यांच्या माध्यमातून एक हजार लोकसंख्येवरील सर्व गावे विकसित भागाशी जोडण्यात यावीत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे उन्नतीकरण, विषय-शाखांची संख्या वाढविणे आदी माध्यमातून अतिरिक्त ७५ हजार जागा वाढविण्यात याव्यात.

▶▶ उर्वरित पान २ वर

# संतोषसाठी बजरंगबाप्पा सोबत प्रियांका गांधी

## मानलं खासदारांना, देशमुख हत्ये विरोधात संसद दणाणली

**दिल्ली । प्रतिनिधी**

खा. बजरंग बप्पा सोनवणे व महाविकास आघाडीतील सहयोगी खासदारांनी खा. प्रियांका गांधी व खा. सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्नाखाली संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपींना आजपर्यंत अटक न झाल्यामुळे संसद भवनाच्या दारात आंदोलन करुन निषेध व्यक्त केला. बीडच्या खासदार कडून संसदेत कुठले प्रकरण गाजवण्याची हि पहिली वेळ आहे.

### ● ओ आव्हाड पाय तोडले हात तोडले कशाला म्हणता

संतोष देशमुख यांची हत्या निर्दयी अगदी नीच पद्धतीने केली आहे सर्व समाजातून संताप व्यक्त होतो आहे मात्र आ जितेंद्र आव्हाड मात्र संतोष चे पाय तोडले हात तोडले असे म्हणत संतोष च्या मृत देहाची एक प्रकारे विटंबना करत असून राजकारणासाठी चुकीची माहिती देत आहेत आरोग्य खात्यातून माहिती घेतली असताना हात पाय तोडण्यात आले नसल्याचे समजते आहे

### ● आ. धस, आ. क्षीरसागर, आ. मुंदडा कडून प्रहार

वरील तिन्ही आमदार कडून सभागृहात हत्येचा निषेध केला आणि आरोपींना अटक करण्याची मागणी केली

### ● आरोपीना कठोर शिक्षाच हवी : ना धनंजय मुंडे

सदरील हत्येवरून दोन समुदाय समोर आणणारे राजकारण दुर्दैवी असल्याचे म्हणत ना धनंजय मुंडे यांनी संतोष देशमुख यांनी आरोपीना अटक करून शासन करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे म्हटले आहे.



### सामान्य माणसाकडून बाप्पाला सलाम

बजरंग बाप्पा हे पहिले नेते आहेत ज्यांनी संतोष साठी संताप व्यक्त केला . राजकारण व जातिवाद बाजूला ठेवत हत्या व आरोपी यांना कडक शासन करण्याची भूमिका घेतली . आज संसदेत खा प्रियांका गांधी आंदोलनात सहभागी झाल्या तेव्हा हा लढा दिल्लीत नेणाऱ्या बजरंग बाप्पा यांना लोक सलाम व्यक्त करत आहेत

# डीएनए मिसमॅच

## भुज'बळावर महायुतीने 'कमळ' फुलवले

## मात्र ओबीसीचे 'फुल' सुकवल



**क्रॉसलाईन**

जरांगे यांना विरोध केला म्हणून छगन भुजबळ यांचे मंत्री पद हुकले असे म्हटले जात आहे मात्र असे अनेक जन जे मंत्री झालेत त्यांनी देखील जरांगे यांचे समर्थन केले होते का , मुळात छगन भुजबळ यांच्या भूमिकेने ओबीसी सोबत डीएन जुळवणी कारणी लागली, सत्तेचे गोमटे बाळ जन्माला आले आणि भाजपने बाळातीन होताच यशाच्या बापाशी फारकत घेतली असे म्हणता येऊ शकते? मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला खोडा घालणारे नीलेश राणे मंत्री झाले , विखे मंत्री झाले मेघना बोरडीकर यांचे वडील जरांगे यांच्या बद्दल खूप काही चांगले बोलले नव्हते तरीही त्यांच्या कन्या महायुतीने मंत्री केल्याच की , पंकजा मुंडे यांनी देखील हाके यांच्या आंदोलनाचे कौतुक करताना मनोज जरांगे यांचे समर्थन थोडीच केले होते तरीही त्या मंत्री झाल्याच की , त्यामुळे माध्यमातून जे काही बोलले जाते ते तार्किक नाही , भुजबळ यांना मंत्री न करणे याचा अर्थ महायुतीने ओबीसीच्या मतांचा केवळ वापर करून घेतला आहे , मुळात ज्या मंत्र्यांची नावे घेऊन ओबीसी कोटा म्हणून दाखवले जाते ते केवळ जन्माने ओबीसी आहेत , त्यांचा तसा ओबीसी चळवळ म्हणून फारसा संबंद नाही , छगन भुजबळ यांनी मात्र ओबीसी चळवळ चालवली त्या साठी नुकसान लांछने शिव्या ऐकल्या सहन केल्या , राजकीय नुकसान सहन करण्याची जोखीम भुजबळ यांनी घेतली , एव्हाना मनोज जरांगे यांनी प्रचार करून देखील येवला मोठ्या मताधीक्याने जिंकला. असे असताना ज्या जरांगे यांनी सरकारच्या नाकात दम आणला त्या जरांगे यांना अंगावर घेण्याचे खरे तर मूल्यांकन आणि गुणांकण होणे अपेक्षित आहे , मात्र महायुतीने भुजबळ यांचा घात केला आहे . शरद पवार यांना सोडताना अजित पवारांच्या भूमिकेला बळ जर कुणी दिले तर अजित भुजेच्या बाजूला असलेल्या

▶▶ उर्वरित पान २ वर

CMYK

# डिजिटल अरेस्ट.... कर नाही तर डर का?



आज मोबाईल आपल्या शरीराचं एक अंग आहे असं सर्वजण वागतात. यात आपल्याकडे झालेला दळणवळण क्रांतीमुळे आता ४-G आणि ५-G तंत्राने सर्वांचे मोबाईल आता इंटरनेट वापरण्यास सक्षम झाले आहेत. डिजिटल इंडियाची झपाट्याने वाटचाल होताना आपणास दिसत आहे. इंटरनेट अर्थात सायबर द्वारे होणाऱ्या गुन्ह्याचे प्रमाणही सोबत वाढत आहे.

जुन्या काळात फसवणूक करण्याचे जे प्रकार होते आजही सुरू असून त्यात आता नव्याची भर पडली आहे असेच म्हणता येईल. या सर्वांवर उपाय म्हणजे कोणतेही तंत्रज्ञान वापरताना त्याची पूर्ण माहिती आपण घेतली पाहिजे आणि त्या माहितीत जर खात्री नसेल तर त्याबाबत इतरांना विचारायला पाहिजे.

आपण डिजिटल व्यवहार करताना यूपीआय चा वापर करतो. यात अधिक सुरक्षितता असावी यासाठी वन टाइम पासवर्ड अर्थात ओटीपी ची सुरुवात त्यासाठी करण्यात आली आहे.

अनेकांना तुमचा पासवर्ड द्या असे फोन येतात असा पासवर्ड किंवा ओटीपी कोणतीही बँक मागत नाही याची आपणास माहिती हवी.

आणखी होणारा फसवणुकीचा मोठा प्रकार म्हणजे तुमचे कार्ड 'ब्लॉक' झाले आहे ते सुरू करण्यासाठी दिलेल्या लिंक वर क्लिक करा यात आपण कार्ड खरंच ब्लॉक झालं किंवा नाही याची खात्रजमा करण्यापूर्वीच कृती करतो. जे कार्ड 'ब्लॉक' झालय म्हणून संदेश आला त्यावर एखादा व्यवहार केल्यावरच कळेल की येणारा फोन चुकीचा होता. आपण लिंक डाऊनलोड करताच आपली सर्व बँकेची माहिती समोरील व्यक्ती काढून घेते आणि आपले आर्थिक नुकसान होते.

हल्ली एक नव्याने समोर आलेला यातनादायक असा फसवणुकीचा प्रकार म्हणजे 'डिजिटल अरेस्ट' अर्थात इंटरनेट द्वारे अटक करण्याचा प्रकार होय यामध्ये व्यक्तीची आर्थिक नुकसान तर होतेच सोबतच मानसिक छळ देखील होतो. याबाबत समाज माध्यमांवर मला आलेला अनुभव मी शेअर केला आहे तो खालील प्रमाणे.

अचानक फोनची बेल वाजली आणि मी फोन उचलला पलीकडून करड्या आवाजात अमुक अमुक नंबर तुमचा आहे का? अशी विचारणा झाली. तुमचे आधार कार्ड वापरून मुंबईमध्ये एक सिम कार्ड वापरत आहे आणि त्यावरील मोबाईल द्वारे अनेक महिलांना अश्लील छायाचित्रे व व्हिडिओ पाठवले आहेत अशी तक्रार आम च्या पोलीस ठाण्याला प्राप्त झाली आहे.. अर्थात समोरील व्यक्ती हिंदीतून बोलत होती म्हणून मी म्हणलं मुंबईतील पोलीस ठाणे असेल तर अधिकाऱ्यांनी मराठीत बोलायला हवे... मी त्याला तसे मराठीत बोला असे सांगितल्यानंतर मै राजेश कुमार हू और मेरा तबादला दिल्ली से मुंबई मे कुछ नही हप्ते हुआ है और मै यहा के पोलीस स्टेशन का इन्चार्ज असे सांगितले. मला एव्हाना शंका होतीच ती आता खात्रीत बदलली की हा खोटा कॉल आहे तरी पलीकडच्या बाजूने तुमच्या विरुद्ध गुन्हा आहे व तुम्हाला डिजिटल अरेस्ट करण्यात येत आहे तुम्ही व्हिडिओ कॉल ला उत्तर द्या असे सांगण्यात आले. पुढे काय होणार हे माझ्या एव्हाना लक्षात आले होते त्यामुळे मी त्याला सरळ सांगितले जर मी मुंबईत गेल्या दीड वर्षात आलोच नाही तर मुंबईतील एखाद्या मोबाईल विक्रेत्याने सिम कार्ड माझ्या आधार कार्ड आधारे दिले कसे याबाबत आपण लोकल पोलीस ठाण्याला कळवा मी त्या पोलीस ठाण्यात जाऊन त्या अधिकाऱ्यांना भेटतो असे म्हणाल्यावर पलीकडून अधिकच जोराने व्हिडिओ कॉल लगाओ... व्हिडिओ कॉल लगाओ असे सुरू झाले त्याने सांगितलेला नंबर दरम्यानच्या काळात मी दुसऱ्या मोबाईलवर ट्रेस केला तसेच संपूर्ण कॉलची रेकॉर्डिंग देखील दुसऱ्या मोबाईल द्वारे व्हिडिओ रेकॉर्ड करून ठेवली व त्याला स्पष्ट बजावले 'नौटंकी बंद करो' असे म्हटल्यावर पलीकडून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ होत फोन कट करण्यात आला त्यानंतर दहा मिनिटांनी मी त्या क्रमांकावर फोन लावला त्यावेळी तो फोन कार्यरत नाही असे उत्तर मला मिळाले. त्याने माझ्या आधार कार्ड वर जो नंबर वापरात आला, तो एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याकडे होता हे देखील माझ्या वैयक्तिक तपसात लक्षात आले परंतु अशाप्रकारे अनेकांना फसवले जात आहे याकरिता ही पोस्ट मी या माध्यमातून करीत आहे.

### ही ती पोस्ट होती

मुळात आपणास फोन आल्यावर आपण त्यातील सत्यता आपल्या दिनचर्येशी लावून शोधावी समोरची व्यक्ती दरडावणीच्या सुरात जे आरोप करीत आहे ते कृत्य आपण खरोखरच केले का? हे स्वतःला विचारावे सम ोरच्याने आपली माहिती याच सायबरच्या महाजालातून काढलेली असते आणि त्याला साधन बनवून मासे गिरवायला बसतो त्याप्रमाणे गळ टाकलेला असतो (म ासे गिरवणे हा कोकणी शब्द आहे) आपण मासा म्हणून गळाला लागल्याचे जाणवल्यावर तो आपले 'हातखंडे' दाखवत पैसे उकळण्याचा प्रयत्न करतो.प्रथम लक्षात ठेवा अशी कोणतीही 'डिजिटल अरेस्ट' कायद्यात नाही आणि दुसरं म्हणजे 'कर नाही तर डर कशाला?'

कोणत्याही गुन्ह्यात प्रत्यक्ष घरी जाऊन ताब्यात घेतले जाते ते देखील स्थानिक पोलिसांच्या मदतीने. याबाबत पहिले आपल्या नजीकच्या पोलीस ठाण्यात कळविले जाते. असा फोन आल्यावर आपण पोलीस ठाण्यात याची खातरजमा करू शकता.

आपण आपले आधार कार्ड अनेक ठिकाणी दाखवतो तसेच त्याची प्रत देखील अनेकदा देतो. अशा माहिती द्वारे तुमच्याबाबत इंटरनेटवर माहिती काढता येते त्यामुळे याबाबत आपण कुठे याचा वापर केला याची नोंद ठेवल्यास असे फोन खोटे आहेत, हे कळण्यास वेळ लागत नाही.

आपली चूक आपल्याला माहिती असते मात्र घाबरून गेल्याने अनेकदा समोरची व्यक्ती त्याचा गैरफायदा घेते आणि त्यात त्यांचे प्राविण्य असल्याने लोकांची हमखास फसवणूक होते. अशा प्रकारचा फोन आपणास आला तर लक्षात ठेवा आपण सायबर पोलिसांच्या १९३० या टोल फ्री क्रमांकावर सूचना द्या. पोलीस अटके संदर्भात व्हॉट्सअप किंवा इतर माध्यमातून डिजिटल अरेस्ट साठी व्हिडिओ कॉल करत नाहीत हे लक्षात घ्या व इतरांनाही सांगा आपण सुरक्षित राहण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे प्रत्येक बाबीची खात्री केल्याखेरीज कृती न करणे सावध रहा सुरक्षित रहा.

**– प्रशांत विजया अनंत दैठणकर,**
**जिल्हा माहिती अधिकारी, बीड**

जनसामान्यांचे शस्त्र,दैनिक
मराठवाडा पत्र
दिनदर्शिका 2025
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com | https://epaper.marathwadapatra.com
प्रिय वाचक / जाहिरातदार
दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आम्ही दै.मराठवाडा पत्र नवीन वर्षानिमित्त दर्जेदार दिनदर्शिका-2025 प्रकाशित करणार आहोत. ही दिनदर्शिका महाराष्ट्रातील घराघरात जाणार आहे. तरी आपण आपली वैयक्तिक फर्म, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, एजन्सी, वाढदिवस, उद्योगधंदे, व्यवसाय यांची जाहिरात देऊन सहकार्य करावे ही विनंती.
जाहिरात दरपत्रक
15000/-
10000/-
7000/-
5000/-
दिनदर्शिका 2025
मराठवाडा पत्र
जाहिरात

जाहिरात
जाहिरात
संपादक : श्री.दत्तात्रय नरनाळे मो. 9822152955

# दरवर्षी 'या' देशात २ लाख ८८ हजार तरुणांना मिळणार काम



जगातील पाच आर्थिक महासत्तांपैकी चौथी महासत्ता असलेल्या जर्मनीबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. जर्मनीला कुशल काम गारांचा तुटवडा भासत आहे. दरवर्षी जर्मनीला लाखो कुशल कामगारांची गरज आहे. मात्र, अशा स्थितीत जर्मनीला लाखो स्थलांतरित नागरिकांना सामावून घ्यावे लागेल. ही बातमी भारतासाठी दिलासा देणारी ठरू शकते. कारण भारतातून मोठ्या संख्येने नागरिक जर्मनीत जातात. अलीकडेच जर्मनीनेही व्हिसाचे नियम शिथिल केले असून त्यामुळे भारतीयांना तेथे जाणे सोपे होणार आहे. तसेच बेरोजगार तरुणांसाठी ही मोठी संधी असणार आहे.

जर्मनीला दरवर्षी २.८८ लाख कामगारांची गरज

अहवालानुसार, जर्मनीला दरवर्षी एकूण २८८,००० कामगारांची गरज भासणार आहे. त्यामुळं जर्मनीला हे कामगार बाहेरुनच आणावे लागणार आहेत. या देशातील स्थिर श्रमशक्तीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, अलिकडच्या वर्षांत नव्हे तर २०२४ पर्यंत दरवर्षी २.८८ लाख स्थलांतरित नागरिकांना सामावून घेण्याची आवश्यकता असेल. येणाऱ्या काळात जर्मनीत दरवर्षी ३ लाख ६८ हजार कामगारांची गरज भासू शकते असंही अहवाल सांगितलं आहे.

वाढत्या आव्हानांमुळं कामगारांची गरज जास्त

Bertelsmann Stiftung यांच्या अहवालानुसार, जर्मनीला वृद्ध लोकसंख्येचा त्यांच्या श्रमशक्तीवर होणारा प्रभाव कमी करण्याची गरज आहे. त्यासाठी या देशाने दरवर्षी शेकडो स्थलांतरितांना येथे आणण्याची गरज आहे, जेणेकरून देशातील कार्यरत संस्था, कार्यालये इत्यादी सुरळीतपणे चालू शकतील. Bertelsmann Stiftung अहवालात असे म्हटले आहे की जर्मनीतील स्थलांतर नियमांवरील वाढत्या राजकीय वादाचा येथे पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांवर मोठा परिणाम होईल. देशातील निर्वासितांची संख्या अलीकडेच वाढल्याने तेथील राजकीय पक्ष कठोर इमिग्रेशन नियमांची वकिली करत आहेत. सन २००० च्या सुरुवातीस जर्मनीमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांची कमतरता सुरू झाली. २००० च्या दशकात सुमारे ६ लाख स्थलांतरितांनी जर्मनीत प्रवेश केला असला तरी आता हा आकडा वाढवण्याची गरज आहे. लोकसंख्येतील बदलांमुळे आणि देशातील लोकसंख्येसमोरील वाढत्या आव्हानांमुळे आगामी काळात स्थलांतरितांची गरज भासणार आहे.

अलिकडच्या काळात देशात बेरोजगाराचे प्रमाण वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी तरुणांना चांगले शिक्षण घेऊन देखील नोकरी मि ळत नाही. कष्ट करण्याची तयारी असते पण नोकरी, काम धंदा मिळत नाही. पण अशा युवकांसाठी आता परदेशात कामाची संधी उपलब्ध होणार आहे. जर्मनीमध्ये काम करण्याची इच्छा असणाऱ्या तरुणांना दरवर्षी या देशात मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत.

पान १/४ वरून पुढे....

## "सिगरेटच्या लायटरनं...

एवढं पाशवी बहुमत लोकांचा जीव घ्यायला दिलंय का?- विधानसभेत आज कामकाजाची सुरुवात होताच विरोधी पक्षाच्या नेत्यांनी बीड व परभणीतील घटनांवर सविस्तर चर्चेचा मुद्दा उपस्थित केला. मात्र, विरोधकांची ही मागणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी फेटाळल्यामुळे विरोधकांनी सरकारचा निषेध केला. तसेच, आज दिवसभराच्या कामकाजावर विरोधकांकडून बहिष्कार घालण्यात आला. सत्ताधाऱ्यांना एवढं पाशवी बहुमत लोकांचा जीव घेण्यासाठी दिलंय का? गुंडांना संरक्षण देण्यासाठी दिलंय का? या दोन्ही मागण्या आम्ही केल्या, तर आमचा आवाज दाबला जातो. चर्चेचीही परवानगी दिली जात नाही. त्यामुळे आम्ही सरकारचा निषेध केला आहे. आम्ही सगळे बीड आणि परभणीला जाणार. मोर्चाही काढणार. या सगळ्या प्रकाराचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग केला आहे, असं विजय वडेट्टीवार म्हणाले.

परभणीत संविधान शिल्पाचा झालेला अवमान कोणताही संविधानप्रेमी सहन करू शकत नाही. त्याचा उद्रेक तिथे झाला. यानंतर अतिरिक्त पोलीसदल मागवून कोम्बिंग ऑपरेशन करण्यात आलं. घराघरातून दलित व्यक्तींना, महिलांना, मुलांना मारहाण करण्यात आली, ही महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी बाब आहे. एक स्पष्ट आहे, तिथे पोलिसांनी आंदोलक सूर्यवंशीला कोठडीत बेदम मारहाण करून त्याची हत्या केल्याचं त्याच्या शरीरावरील जखमांवरून दिसून येत आहे. पोलीस यासाठी जबाबदार नाहीयेत का? त्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करणं चूक आहे का?, असे सवाल विजय वडेट्टीवार यांनी यावेळी उपस्थित केले.

एवढं भीषण कृत्य कधीही पाहिलं नाही- बीडमध्ये एक गुंड सरकार व मंत्र्यांच्या संरक्षणात खुलेआम धमक्या देतो. तिथे सरपंचाला ज्या क्रूरपणे मारहाण करण्यात आली, त्याची हत्या करण्यात आली, एवढं भीषण कृत्य मी कधी पाहिलं नाही. लायटरनं त्याचे डोळे जाळले गेले. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मृतदेहावर उड्या मारून नाचण्यात आलं. हे काय चाललंय महाराष्ट्रात? हे काय बघतोय आपण? असा जाब वडेट्टीवार यांनी सरकारला विचारला.

## सरपंच हत्याप्रकरणी...

यासोबतच आमदार असताना सुरक्षेसाठी पोलीस विभागाकडून एक अंगरक्षक देण्यात येतो पण वाल्मीक कराड सारख्या गुन्हेगाराला मात्र दोन-दोन अंगरक्षक देण्यात येतात! असाही प्रश्न आ.क्षीरसागर यांनी यावेळी उपस्थित केला.

## डीएनए मिसमॅच...

**जेस्ट भुजेणे ते म्हणजे छगन भुजबळ . छगन भुजबळ केवळ ओबीसी नेते नाहीत तर महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात मोठे पाकीट असलेले मतांचे मालक आहेत . त्यांच्या भूमिकेने अवघे ओबीसी म हायुतीने मशनीत कोंबुन भरले , विजय साधला आणि आज भुजबळ नाशिकच्या दिशेने रवाना. छगन भुजबळ यांचा बाज नेहमी लढवय्या राहिलेला , मुंबईचे पहिले सेनेचे महापौर , सेनेचे पहिले आमदार , एकूण सात वेळा झालेले आमदार असलेले भुजबळ राज्याचे उपमुख्यमंत्री गृहमंत्री बांधकाम मंत्री राहिलेले , फुले शाहू आंबेडकर विचार घेऊन समता परिषद उभी करून आमदार तोडीचे कार्यकर्ते उभे करणारे भुजबळ महायुतीने छाटले आहेत . मुळात सेना भरीला असताना बंड करणे सोपे नव्हते जे भुजबळ यांनी केले , आज तर नैतिकता गमावून बसलेल्या टोळक्यात त्यांना राहणे पटणार नाहीच , जहा नही रइना वहा नही रहेना म्हणणारे भुजबळ सोपे नसतील . आता स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका सोडल्या तर आता काही भुजबळ वाचून कुणाचे अडणार नाही मात्र सरकारला नैतिक बळ जे गरजेचे असते ते असणार नाही . ज्या ओबीसी मतांची अक्षरस लूट महायुतीने केली त्या मतांचा वाली उपाशी ठेऊन ओबीसी म तांची चिवटी केली नाही काय . मुळात भाजपची महायुती प्रतिगामी विचारांची , ओबीसी फुले शाहू आंबेडकर विचारांचा फुलेगुछ , परस्पर विरुद्ध टोक भुजबळ यांनी जुळवली , एका आंदोलनाच्या धगिने अपरिहार्यपणे ओबीसी मतांचे आकुंचन महायुतीच्या पथ्यावर पडले . महायुतीने एकाच घरात दोन मंत्री केले मात्र ओबीसीचे भीष्म यांना तीक्ष्ण बाणांची शय्या करणे बहू जनाना पटले नाही .**

## राज्यात सुरु असलेल्या...

नागरिकांच्या आरोग्यावर अधिकाधिक भर देतानाच गर्भाशयम ुखाच्या कर्करोगावरील उपचारांवर भर देण्यात यावा. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा, लसीचा उपयोग करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी सचिवांना दिले. बांबू लागवड अभियानातून शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय उपलब्ध करण्याबरोबरच जंगल क्षेत्रामध्ये वाढीसाठी विविध उपाययोजना राबविण्यात याव्यात. त्यासाठी रोपवाटिकांमध्ये बांबू रोपे उपलब्ध करून द्यावीत. मराठवाड्यातील पडीक जमिनीवर मोठ्या प्रम ाणात बांबूची लागवड करून जंगल क्षेत्रामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करावा. राज्यातील महत्त्वाकांक्षी अभियानांना गती देण्यासाठी मुख्य सचिवांनी प्रमाणित प्रक्रिया (एसओपी) ठरवून द्यावी. अभियानाचा कालावधी, संबंधितांच्या जबाबदाऱ्या याबाबत स्पष्टता ठेवावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, 'एडीबी'च्या संचालक मिओ ओका, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, नियोजन-महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, ग्रामविकासचे प्रधान सचिव एकनाथ डवले, वने विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, पर्यावरणचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव सचिव श्रीकर परदेशी यांच्यासह 'एडीबी'चे विविध विषयतज्ज्ञ उपस्थित होते.

## परळीतील अपहरण...

आत पहिला आरोपी अटक केला त्यानंतर इतर चार आरोपी अटक करण्यात आले. सर्व आरोपीना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे... परळी शहर चे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन संभाजीनगरचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश शिंदे, नितीन गट्टूवार, पोलीस जमादार नरहरी नागरगोजे, बालाजी दराडे, भास्कर केंद्रे गोविंद येलमटे, अंकुश मेंडके, गोविंद भताने, पंडित पांचाळ आयटीसेल चे बिकी सुरवसे यांच्या पथकाने कारवाई केली.

काय आहे प्रकरण?- पाच अनोळखी व्यक्तीने तोंडाला रुमाल बांधून जीवे मारण्याच्या धमक्या देऊन ९ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता उद्योजक अमोल विकासराव डूबे यांचे त्यांच्या ऑफिस जवळून मोटर सायकल अडवून जबरदस्तीने कार मध्ये बसवून आपहरण झाले. व परळी - अंबाजोगाई रस्त्यावरील कन्हेरवाडी घाटात नेऊन दोन कोटी दे नाहीतर तुला जिवंत मारू अशी धमकी दिली. या धमकीनंतर डूबे यांनी स्वतःजवळील रोख रक्कम, गळ्यातील सोन्याचे लकिट व आपल्या ड्रायव्हरच्या साह्याने मागून घेतलेले सोन्याचे बिस्किट व रोख रक्कम असे दिल्यानंतर आरोपींनी उद्योजक डूबे यांची कन्हेवाडी घाटातून रात्री साडेअकरा वाजता सुटका केली. आरोपी अंबाजोगाई कडे गेले. या थरार प्रकारानंतर अमोल डूबे हे परळीला आले दुसऱ्या दिवशी दहा डिसेंबर रोजी परळी शहर पोलीस ठाण्यात त्यांनी तक्रार नोंदवली त्यावरून पोलिसांनी पाच अनोळखी व्यक्तीविरुद्ध अपहरण व खंडणीचा गुन्हा दाखल केला.

## पवनचक्की कंपनीकडून....

तर कंपनीचे अधिकारी पोलिसांना हाताशी धरुन उलट शेतकऱ्यांनाच जेलमध्ये टाकण्याची धमकी देतात. असा आरोप मुळूक, गलधर यांनी केला आहे. पवनचक्कीवाल्यांकडून शेतकऱ्यांची रितसर परवानगी न घेता त्यांच्या शेतामधून तार ओढण्याचे काम केले जात आहे. पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला वैतागून सुलतानपूर येथील एका शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला तर नाईकवाडे नामक शेतकऱ्यावर गुन्हा दाखल करण्याचा प्रकार घडला आहे. ज्या गावात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू आहे त्या गावात या कंपनीकडून स्थानिक गुंडांना हाताशी धरून शेतकऱ्यांना धम कवण्याचे व फसवणुकीचे प्रकार घडले आहेत. पवनचक्की कंपनीच्या गुन्हेगारीला वैतागून शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहेत. आता पवनचक्की कंपनीच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बीड जिल्हा शिवसेना आक्रमक झाली आहे. पवन चक्की कंपनीकडून जिल्ह्यात ज्या शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. त्या सर्व शेतकऱ्यांनी कागदपत्रांसह शिवसेना बीड जिल्हा कार्यालय बार्शी रोड येथे लेखी स्वरूपात तक्रार दाखल कराव्यात असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

## बाळराजे पवारांच्या..

आयोजन करण्यात येणार आहेत तर सर्व कार्यक्रमास मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार, सौ गिताभाभी बाळराजे पवार ,शिवराज पवार उपस्थित राहणार आहेत तरी मतदारसंघातील सर्वांनी आरोग्य शिबीरात सहभाग घ्यावेत असे संयोजन समितीच्या वतिने आव्हान करण्यात आले होते

## रंजेगावच्या दोनशे...

ही तरतूद असताना जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय आणि बीडच्या तहसील कार्यालयात हे तक्रारदार वारंवार चकरा मारत असताना त्यांना रेशनमाल अथवा नियमाप्रमाणे लाभ दिला जात नाही. ही बाब गंभीर असल्याने नियम आणि कायद्यातील तरतुदीप्रमाणे दोन्ही कार्यालयातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी देखील देशमुख यांनी केली आहे.

## वाहनांची नवी...

करण्यात येईल. तरी सर्व वाहन धारकांनी,नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, स्वप्निल माने यांनी केले आहे.

## ऊस तोडणी...

गोदावरी खोऱ्यात लवकरात लवकर यावे आणि मराठवाडा सुजलाम सुफलाम करण्यात यावा अशी मागणी करीत त्यांनी मुख्यमंत्री सौर ऊर्जा पंप या योजनेअंतर्गत मागेल त्याला सौर कृषी पंप योजना,

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र व राज्य सरकारचे अभिनंदन केले. तसेच, सर्व शासकीय कामकाज आणि व्यवहार मराठी भाषेतूनच व्हावा, अशी मागणी केली.मनरेगा योजना अंतर्गत लाभार्थ्यांना मिळणारी रक्कम ही थेट त्यांच्या खात्यात जमा करण्याची आवश्यकता आ.धस यांनी व्यक्त केली. छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाला सरकारकडून परवानगी दिल्याबद्दल अभिनंदन केले.यासह आदी योजनांची अभ्यासपूर्ण केलेली मांडणी यावर सभागृहात उपस्थित सर्व सदस्यांनी बाके वाजवून त्यांना प्रतिसाद दिला... सभागृहात अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करत सरकारच्या निर्णयांचे स्वागत करून त्यांच्या कार्याची प्रशंसा आ.सुरेश धस यांनी केली.

# भुजबळ साहेबांना मंत्री मंडळातून वगळले ओबीसी समाज चिडला

## माजलगाव पाथरी रोडवर एक तास रस्ता रोको व्यक्त केला निषेध सरकार विरोधात दिल्या घोषणा

**माजलगाव । प्रतिनिधी**

ओबीसी चे नेते आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री छगन भुजबळ यांना मंत्री मंडळातून वगळण्यात आल्याने महाराष्ट्रातील तमाम ओबीसीच्या मनात चीड निर्माण झाली आहे संतोष निर्माण झाला आहे याचाच निषेध म्हणून माजलगाव पाथरी रोडवर खरात आडगाव फाटा येथे आज सकाळी १० वाजता रास्ता रोको करून शासनाचा निषेध व्यक्त केला या वेळी संतोष रसावे यांच्या सह बहुसंख्य ओ बी सी बांधवं उपस्थित होते. माजलगाव तहसीलदार यांना सकल ओबीसीच्या निवेदन देण्यात आले भुजबळ साहेबांनी आरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात झुंज दिली आहे आणि ओबीसी सम ाजाचे आरक्षण अबाधित ठेवण्याचे काम केले आहे भुजबळ साहेब सतत ओबीसींच्या हक्कासाठी न्यायासाठी झगडत असतात म्हणूनच माहिती सरकारकडून भुजबळ साहेबांना हिनतेची वागणूक देऊन मंत्री मंडळातून वगळले गेले व अपमानित केले गेले यामुळे महाराष्ट्राच्या तमाम ओबीसी बांधवांवर हा एक प्रकारे शासनाने केलेला अन्याय च आहे यामुळे महाराष्ट्रातील सकल ओबीसी समाज नाराज झाला असून ओबीसी समाजामध्ये शासनविरोधी चीड व असंतोष निर्माण झाला आहे त्यामुळे सन्मानपूर्वक भुजबळ साहेबांना मंत्रिमंडळात घ्यावे या मागणीसाठी माजलगाव पाथरी रोडवर आडगाव फाटा येथेआज सकाळी दहा वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात आले जिल्ह्यातील तमाम ओबीसी बांधवांनी या रास्ता रोको मध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपले न्यायी आंदोलन यशस्वी केले यावेळी संतोष रासवे यांनी माजलगाव तहसीलदार यांचे सोबत चर्चा करून निवेदन दिले या वेळी परिसरसतील सरपंच दशरथ आढाव बाबुराव रासवे भगवान लव्हाळे मछिंद्र बापू रासवे भगवान भाऊ आढाव भास्कर आबा शेजुळ लक्ष्मण भाऊ रासवे मछिंद्र आढाव लखण आढाव समाधान रासवे गोरक्ष आढाव बालासाहेब मह्वोळे आनंद आढाव आशोक कबळे ग्राम पंचायत सदस्य बालासाहेब आढाव महेश रासवे माऊली आढाव दत्ता लव्हाळे बहुसंख्य ओबीसी बांधव उपस्थित होते.



### थोडक्यात

## ट्रकने स्कुटीला धडक दिल्याने एक जागीच ठार एक गंभीर जखमी



**बीड । प्रतिनिधी**

गेवराई जवळ बायपास रस्त्यावर सायंकाळच्या सुमारास स्कुटीवरून बीडच्या दिशेने येणाऱ्या दोघांना उडविले. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला असून एक जण जखमी झाला आहे.गेवराई येथील बायपासजवळ स्कुटीवरून बीडच्या दिशेने येत असलेल्या दोन ट्रक एकमेकांना ओव्हरटेक करत असताना ट्रकने स्कुटी जोराची धडक दिली त्यामुळे स्कुटीवरील चालकाला तोल सांभाळता न आल्याने पाठीमागील चाकाखाली स्कुटी आली. यामध्ये पाठीमागे बसलेल्या बाजूला पडला. तर गाडी चालविणाऱ्याच्या डोक्यावर टायर गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. रस्त्यावर मांसाचा सडा पडला होता. उपस्थित लोकांनी जखमीला रुग्णालयात घेऊन गेल्याचे समजते. यातील दोघांचीही नावे समजले नसून म्रताची ओळख पटविण्याचे काम पोलीस करत आहेत.

## कापूस उत्पादक शेतकऱ्यांची मागणी, सीसीआयच्या जाचक अटी कमी कराव्यात : संचालक धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**

प्रतिकूल हवामान परिस्थिती शेतकरी कापूस उत्पादन घेत आहेत. बीड जिल्ह्यातील बऱ्याचशा भागात कापूस उत्पादन घेणे बंद केले आहे. ज्या भागात पिकवला जातो त्या शेतकऱ्यांना खर्चाच्या तुलनेत भाव मिळत नसल्याचे शेतकरी सांगताहेत. शेतकऱ्यांना प्रती क्विंटल ११००० रुपये भाव आवश्यक असताना सध्या खाजगी बाजारात ७००० पेक्षा कमी दर मिळत आहे. सरकारने हमीभाव खरेदीसाठी सीसीआय केंद्रे सुरू केले असून ही केंद्रे असून अडचण नसून खोळंबा अशी झालेली आहेत. कापसातील ओलावा (मॉईश्चर) १२% पेक्षा अधिक असेल तर शेतकऱ्यांच्या कापसाला सीसीआय कडे विकता येत नाही, त्यासोबतच धाग्याच्या लांबी अनुषंगाने हम ीभाव ७५२१ असताना देखील बीड मध्ये मात्र ७४२१ रुपये देण्यात येतो आहे. या दोन्ही अटीमुळे शेतकऱ्यांना इच्छा नसताना आपला कापूस सीसीआय ऐवजी खाजगी व्यापाऱ्यांना द्यावा लागत आहे. यात शेतकऱ्यांचे प्रती क्विंटल ४०० ते ५०० रुपयांचे नुकसान होत असून यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट तयार होत आहे. विद्यमान म हायुती सरकार मधील अनेक लोकप्रतिनिधींनी निवडणूक काळात कापूस व सोयाबीन प्रश्ने मार्गी लावू असे आश्वासन दिले होते या आश्वासनांचा विसर या लोकप्रतिनिधींनी पडू न देता शेतकऱ्यांना या जाचक अटीतून वाचवावे अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरावे लागेल असं आवाहन प्रसिध्दी पत्रकाद्वारे संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले आहे.

## गेवराईत 14 जानेवारीपासून भव्य कीर्तन महोत्सव

### संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या भव्य कीर्तन महोत्सवाची जय्यत तयारी सुरु

**गेवराई । प्रतिनिधी**



येथील संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने मंगळवार दि.१४ जानेवारी पासून भव्य कीर्तन महोत्सवास प्रारंभ होत असून यावर्षीचा हा द्वी-दशक ( २० ) भव्य कीर्तन महोत्सव श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ, नगरपरिषद सर्व्हे.नं.६३ च्या सहन जागेवर घेण्यात येणार आहे. कीर्तन महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा लाभणार आहे. कीर्तन महोत्सवाचे हे २० वे वर्ष आहे. सध्या कीर्तन महोत्सवाची जोरदार तयारी चालू असून प्रतिष्ठानच्या वतीने सर्व पदाधिकारी आपले योगदान देत आहेत. गेवराईकर या भव्य कीर्तन महोत्सवाची दरवर्षी आतुरतेने वाट पाहत असतात. तरी भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. वै.गुरुवर्य संत भगवानबाबा व वै. संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेवराई मध्ये संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानतर्फे मागील १९ वर्षांपासून भव्य-दिव्य अशा कीर्तन महोत्सवाचे नियोजनबद्ध आयोजन केले जात आहे. यामध्ये सर्व जाती धर्मातील भाविकांचा लक्षणीय सहभाग असतो. यावर्षीच्या कीर्तन महोत्सवाचा प्रारंभ मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वा.कलश पुजन व सायंकाळी ७ वा.दीपप्रज्वलन करुन ह.भ.प. समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या कीर्तनाने महोत्सवाची सुरुवात होणार आहे. नित्यनेमाने रोज रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तने होणार आहेत. बुधवार दि.१५ रोजी पुणे विद्यापीठचे गोल्ड मेडलिस्ट ह.भ.प.प्रा.डॉ. प्रशांत महाराज ठाकरे, गुरुवार दि.१६ रोजी केज येथील ह.भ.प. अंकिता ताई घुले, शुक्रवार दि.१७ रोजी विनोदाचार्य ह.भ.प. भाऊसाहेब म हाराज पन्हाळकर, शनिवार दि.१८ रोजी रामायणाचार्य ह.भ.प.उद्धव महाराज चोले, रविवार दि.१९ रोजी श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थान, शिरूर (का.) चे मठाधिपती ह.भ.प. स्वामी विवेकानंद शास्त्री, सोमवार दि.२० रोजी परभणी येथील ह.भ.प. एकनाथ महाराज चत्तर शास्त्री, मंगळवार दि.२१ रोजी आळंदी येथील च..झह.ऊ झहळश्रीहिळीं विद्यावाचस्पती डॉ.श्री. रविदासजी महाराज शिरसाठ, बुधवार दि.२२ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत दुर्गाशक्तीगड, भिलवडे चे मठाधिपती ह.भ.प. गणेश महाराज शास्त्री यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल व नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

## गोरक्षनाथ विद्यालय ढेकणमोहा येथे जागतिक एड्स जनजागृती कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**



गोरक्षनाथ विद्यालय व महाविद्यालय ढेकनमोहा या ठिकाणी एक डिसेंबर ते १५ डिसेंबर जागतिक एड्स जनजागृती पर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बीड जिल्हा रुग्णालय जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष डापको ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा लिंक वर्कर स्कीम बीड जिल्हा व गोरक्षनाथ विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष डापको सुहास जी कुलकर्णी सर, लिंक वर्कर बीड जिल्हा स्कीम चे डी आर पी रामेश्वर वाघमारे सर. लिंक वर्कर अंगद खवतड, संस्थेचे सचिव सोमनाथ बडे सर, संस्थेचे सहसचिव संजय बडे सर, शाळेचे मुख्याध्यापक डी. एस. मुंडे सर, घोळवे सर, पत्रकार विनोद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



*नामदार धनंजयजी मुंडे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री पदी नियुक्ती झाल्याबद्दल नागपूर येथे त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना नगरसेवक अमर नाईकवाडे, गटनेते फारुख पटेल, ज्येष्ठ नेते मोईन मास्टर साहेब, अशपाक इनामदार, अलीम पटेल व इतर.*

## आंदोलनकर्ते यांना जिल्हाधिकारी, तहसिल कार्यालयाच्या आवारात निवारा शेड, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहांची व्यवस्था करा : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील शासकीय कार्यालये उदाहरणार्थ जिल्हाधिकारी कार्यालय आणि तहसिल कार्यालयाच्या नविन इम ारतीच्या नियोजित आराखड्यात आंदोलनकर्ते यांना बसण्यासाठी जागा, निवारा शेड,पिण्याचे शुद्ध पाणी व स्वच्छतागृहाची सोय करण्यात यावी आणि बीड शहरातील बीड ते नगर रोड राष्ट्रीय महामार्गावरील रूंदीकरण दरम्यान नालीच्या कामासाठी शासकीय कार्यालयासमोरील संरक्षक भिंती आणि नगरपालिकेने बांधलेली स्वच्छतागृहे तोडण्यात आली त्यामुळे शासकीय कार्यालयात येणा-या नागरीकांची गैरसोय होत असुन नालीचे बांधकाम पूर्ण झालेल्या ठिकाणी तातडीने संरक्षक भिंत आणि स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत. अथवा लोकवर्गणीतून आंदोलनकर्त्यांना निवारा शेड बांधण्याची रितसर परवानगी देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन,शेख मुस्ताक यांनी शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांना लेखी निवेदनाद्वारे करत प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा ईशारा दिला आहे.



आंदोलनकर्ते यांना नियोजित जागा, निवारा शेड, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे याची सोय उपलब्ध करावी.

बीड शहरातील नगररोड वरील जिल्हाधिकारी, तहसिल, पंचायत समिती, सामाजिक न्याय भवन शासकीय कार्यालये याठिकाणी आंदोलनकर्ते यांना निवारा असणारी मोठमोठाली झाडे जिल्हा प्रशासनामार्फत तोडण्यात आली असुन आंदोलनकर्ते यांचा निवारा हिरावला गेला आहे. तसेच नवनिर्माण जिल्हाधिकारी व तहसील कार्यालय आवारात आंदोलनकर्ते यांच्यासाठी नियोजित जागा, निवारा शेड, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करण्यात यावी.

बीड नगर रोड रस्ता रुंदीकरण दरम्यान तोडण्यात आलेली नगरपरिषदेची स्वच्छतागृहे तातडीने बांधण्यात यावीत.

## सर्वपक्षीय मदतफेरीत सहभागी व्हा मयत देशमुख कुटूंबीयांना आर्थिक मदत करा: आ. प्रकाश दादा सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**



मस्साजोग येथील मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांकरीता म ाजलगाकवरांच्या वतीने मदतीचा हात अभियाना अंतर्गत आज दि. १८ बुधवारी सकाळी छत्रपती संभाजी महाराज चौकातुन म दतफेरी काढण्यात येणार असुन या फेरीत सहभागी व्हा असे आवाहन आमदार प्रकाश सोळंके यांच्या वतीने करण्यात आले आहे. केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निघृण हत्या करण्यात आलेली असुन त्यांच्या कुटूंबीयांना मदत देण्याचा संकल्प माजलगावकरांच्या वतीने करण्यात आला आहे. बुधवारी सकाळी छत्रपती संभाजी महाराज चौकातुन सकाळी १०.०० वाजता मदतफेरी काढण्यात येणार आहे. तरी सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, सर्व सामाजिक संघटना, युवक - युवतींनी उपस्थित राहुन सढळ हाताने मदत करावी असे आवाहन माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी केले आहे.

# अंबाजोगाई शहरानजीक बनावट दारूचा कारखाना, ३६ लाख रूपयांचा ऐवज जप्त

### राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाची कारवाई

**अंबाजोगाई । प्रतिनिर्धी**

राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने अंबाजोगाई शहरातील बुट्टेनाथ दरी मध्ये असलेल्या बनावट दारू च्या कारखान्यावर धाड टाकून ३६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केल्या मुळे खळबळ उडाली आहे.

मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड श्री. विश्वजीत ए. देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. १६.१२.२०२४ रोजी गुप्त माहितीच्या आधारे मौजे बुट्टेनाथ दरी येथे काटवन झाडीत असलेल्या गोडावून शेडमध्ये ता. अंबाजोगाई जि. बीड येथे कार्यालय निरीक्षक,

राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, अंबाजोगाई, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क माजलगाव, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क बीड यांच्या पथकाने कारवाई करत छापा टाकला असता सदरील गोडावून पत्री शेडम ध्ये खालील प्रमाणे मुद्येमाल जप्त करण्यात आला.या मध्ये १) बनावट देशी दारु रॉकेट मद्याच्या १०५०० बॉटल (१०५ बॉक्स) त्याची अं. कि. रु.३६७५००/- २) एक जेएसएल जिंदाल स्टेनलेस कंपनीचे स्वयंचलित सिलींग, फिलींग व बॉटलींग मशीन अं. किं. रु.१५००००/- ३) २०० लि. मापाचे स्पीरीटने भरलेले प्लास्टीक बॅरल अं. किं. रु. २५०००/- ४) २०० लि. मापाचे १२ रिकामे प्लास्टीक बॅरल अं. किं. रु.६०००/- ५) ९० मिली क्षमतेच्या १००८०० प्लास्टीकच्या रिकाम्या बाटल्या अं. किं. रु.१००८००/- ६) देशी दारु रॉकेटचे ३०००० बुचे अं. किं. रु.३००००/- ७) देशी दारु रॉकेटचे ८००० लेबल अं. किं. रु.१६०००/- ८) २००० लि. व ५०० लि. चे एकुण ३ पाण्याचे बॅरल अं. किं. रु.९०००/- ९) पाण्याची मोटार २ नगर अं. किं. रु.१००००/- १०) प्रवरा प्रिंट चे ६० टेप रोल अं. किं. रु.३०००/- ११) देशी दारु रॉकेट बॉक्स चे पुठ्ठे १००० नग अं. किं. रु. २०००/- १२ ) ५ अल्कोहोल मीटर अं. किं. रु.२५००/- १३ ) विविध कंपनीचे ४ भ्रमणध्वनी अं. किं. रु.७५०००/- १५ ) एक किया कंपनीचे सेलटॉस चारचाकी कार जिचा नोंदणी क्रं. एमएच-१२ आरवाय-४४०६ अं. किं. रु.१००००००/- १६) एक अशोक लेलँड कंपनीचे आयशर टेम्पो ज्याचा नोंदणी क्रं. एमएच-४० सीडी ३४२१ अं. किं. रु. १७०००००/- १७) १० लिटर क्षमतेचे इसेंस ने भरलेले प्लास्टीक कॅन अं. किं. रु. ७५००/- १८ ) पाण्याचे प्लास्टीकचे पाईप - ५ नग अं.किं. रु. २५००/- १९) एक आर.ओ. पाणी फिल्टर मशीन अं. किं. रु.५०,०००/- असा एकुण रू. ३५,५६,८००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या गुन्ह्यातील आरोपी १) आकाश गोवर्धन नेहरकर (वय २९ वर्षे), रा. गांधीनगर, अंबाजोगाई जि. बीड आणि धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथील पाच अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. तर, पप्पू कदम व दिनेश गायकवाड हे फरार झाले असुन त्याचा शोध सुरु आहे. या आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ च्या विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई ही विश्वजीत ए. देशमुख ( अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली डी. डी. चौरे (निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड), आर. बी. राठोड, (निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बीड), डी. आर. ठोकळ दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अंबाजोगाई, ए. एल. कारभारी, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भ.प. क्रं. ०२ बीड, तसेच आर. बी. कदम स.दु.नि., जवान - एस. व्ही. धस, आर. ए. जारवाल, बी.के.पाटील, आर. एम. गोणारे, के. एन. डुकरे, एस. व्ही. लोमटे, डी. एस. वायभट, ए. पी. कदम, श्रीमती एस. एस. ढवळे, आर. जी. मुंडे, एस. एस. ढोले यांनी सदरील कार्यवाही यशस्वीरित्या पार पाडली. पुढील तपास निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड हे करीत आहेत.



# परळीतील अपहरण प्रकरणाची उकल; पाच आरोपींना अटक, मुद्देमाल जप्त!

परळी । प्रतिनिधी

येथील उद्योजक अमोल डूबे यांचे ९ डिसेंबर रोजी रात्री औद्योगिक वसाहत परळी येथून बंदुकीचा धाक दाखवून अपहरण करून परळी - अंबाजोगाई रस्त्यावरील कन्हेरवाडी घाटात सोन्याच्या बिस्किटासह रोख रक्कम आठ लाख २८ हजार रुपयाची खंडणी घेतल्याप्रकरणी परळीच्या शहर पोलिसांनी एकूण पाच आरोपींना अटक केले आहे व खंडणीपोटी घेतलेले दहा तोळ्याचे सोन्याचे बिस्कीट व रोख रक्कम जप्त करण्यात आले आहे . तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या दोन कार व गावठी कट्टा, एक जिवंत काडतुस ही पोलिसांच्या पथकाने जप्त केले आहे. असा एकूण १७ लाख १२ हजार रुपये किमतीचा एकूण ऐवज परळी पोलिसांनी ताब्यात घेण्यात यश मिळवले आहे. अशी माहिती बीडचे जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ व संभाजीनगरचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी सोमवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.



परळी शहर पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीमध्ये परळीतील एकाचा तर अंबाजोगाई येथील परळी वेस भागात राहणाऱ्या चौघा जणांचा समावेश आहे. चैतन्य पंढरी उमाप वय २४ वर्ष, सागर उर्फ बबलू सूर्यवंशी वय २२ वर्ष शंकर भगवान जोगदंड वय २२ वर्ष, सचिन श्रीराम जोगदंड वय २५ वर्ष सर्व राहणार परळीवेस अंबाजोगाई व जय उर्फ सोनू संजय कसबे वय २६ वर्ष राहणार सिद्धार्थ नगर परळी ही अटक आरोपींची नावे आहेत. या गुन्हाचा मास्टर माईंड परळीच्या सिद्धार्थ नगर भागातील जय उर्फ सोनू संजय कसबे हा असून त्याला पुणे येथे जाऊन पोलिसांनी अटक केली आहे. तर गावठी कट्टा व एक जिवंत काडतुस सचिन श्रीराम जोगदंड यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आली आहे. असे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी सांगितले. गुन्हा दाखल झाल्यानंतर तीन दिवसाच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

### ▸सहा पैकी पाच आरोपी अटकेत

हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी बीडचे जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक चेतना तिडके, गेवराईचे उप विभागीय पोलीस अधिकारी राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलिसांची दोन पथके, एलसीबी बीडचे पथक तसेच आयटीसेलचे पथक नेमण्यात आले. संभाजीनगरचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी याप्रकरणी आरोपींची शोध मोहीम सुरू करण्यासाठी पोलीस पथकांना मार्गदर्शन केले, घटनास्थळाचे सी सी टीव्ही फुटेज तपासण्यात आले व आयटीसीएल बीड यांच्या सहकार्याने घटनास्थळाचा मोबाईल टावर डाटा घेऊन व सीसीटीव्ही फुटेच्या मदतीने आरोपींच्या येण्या जाण्याचा मार्ग शोधून काढला व आरोपी निष्पन्न केले. एकूण सहा आरोपी पैकी पाच आरोपीना अटक करण्यात परळी पोलिसांना यश आले आहे तसेच मुद्देमाल ही सर्व जप्त करण्यात आला आहे.

### ▸तपासी टीमला बक्षीस

परळीतील अपहरण, खंडणीचा गुन्हा गांभीर्यपूर्वक होता. परंतु संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी शहर, संभाजीनगर, आयटीसेल पोलीस कर्मचाऱ्यांनी कौशल्यपूर्वकपने हा गुन्हा उघडकीस आणून आरोपीकडून १७ लाख रुपयाचा ऐवज जप्त केला आहे. तपासी टीमला बक्षीस देण्यात आले आहे. – अविनाश बारगळ, जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड

## पवनचक्की कंपनीकडून फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेनेकडे लेखी तक्रारी द्याव्यात : मुळूक, गलधर

### पवनचक्कीवाल्यांच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना आक्रमक

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पवनचक्कीचे जाळे दिवसेंदिवस पसरत असून गुंडगिरी ही वाढत आहे. शेतात पवनचक्की उभारण्यासाठी या कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे. पवनचक्की कंपनीच्या त्रासाला आणि गुन्हेगारीला वैतागून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पवनचक्की कंपन्यांच्या गुन्हेगारीला





आळा घालण्यासाठी शिवसेना आक्रमक झाली असून पवनचक्की कंपनीकडून फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेनेच्या जिल्हा कार्यालयात लेखी स्वरुपात तक्रारी द्याव्यात असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

जिल्ह्यात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू असून पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा दिला जात नाही. शेतकऱ्यांनी मावेजा मागितल्यास स्थानिक गुंडांकडून धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. तसेच शेतकऱ्यांनी मावेजासाठी पवनचक्कीचे काम अडविले

▶▶ उर्वरित पान २ वर

## बाळराजे पवारांच्या वाढदिवसा निमित्त गेवराई मतदारसंघात विविध कार्यक्रमाचे आयोजन

गेवराई । प्रतिनिधी

मतदार संघातील लोकनेते बाळराजे पवार यांचा वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसा निमित्त आरोग्य शिबीर, रुग्णालयात रुग्णाना फळे वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप, गरजु लोकांना बिलॅकट,रक्तदान शिबीर आयोजन करुन बाळराजे पवार यांचा वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे

स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे जनक गोरगरीबांचा आधार मा.बाळराजे दादा पवार यांचा दि.२१ डिसेंबर रोजी गेवराई



मतदारसंघात विविध सामाजिक उपक्रमांने वाढदिवसा निमित्त शहरात रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, शालेय साहित्यांचे वाटप, अशा विविध कार्यक्रमाचे

▶▶ उर्वरित पान २ वर

## रंजेगावच्या दोनशे लाभार्थ्यांना दोन वर्षांपासून रेशन माल मिळेना; कायदा पायदळी : ॲड. अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील रंजेगाव येथील पात्र असलेल्या दोनशे पेक्षा अधिक लाभार्थ्यांना गेल्या चार महिन्यापासून रेशन माल मिळत नाही. त्यामुळे यात प्रशासनासह जे कोणी दोषी असतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी केली आहे.

रंजेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते आसाराम आबुज यांनी पात्र शिधा पत्रिकाधारकांना लाभ मिळावा म्हणून गेल्या चार महिन्यापासून तक्रारी केलेल्या आहेत. या तक्रारी तक्रारदारांनी केलेल्या आहेत. आसाराम आबुज पात्र तक्रारदारांसोबत राहून त्यांना मदत करीत आहेत.

तक्रारदारांपैकी सदुशष्ट तक्रारदार यांना गेल्या दोन वर्षापासून मिळत नाही. त्यांचे कार्ड बंद पडलेले आहेत. नवीन रेशन कार्ड देण्याची मागणी त्यांनी कित्येक वेळेस केलेली आहे. तरी देखील त्यांना नवीन रेशन कार्ड मिळत नाहीत. तर शंभरावर तक्रारदारांना गेल्या दोन वर्षापासून माल मिळत नाही. हे सर्व शेतकरी वर्गातील असल्याची दिसते. त्यांना कुठलाही लाभ मिळत नाही. पात्र असतानाही दोन-दोन वर्ष माल न मिळणे ही गंभीर बाब आहे. तक्रारदारांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर ॲड. अजित देशमुख यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांच्यासह अन्य ठिकाणी निवेदनाद्वारे पाठपुरावा चालू केल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी यात तात्काळ लक्ष घातले आहे. लवकरात लवकर रेशन माल आणि लाभ मिळेल, असे त्यांनी ॲड. देशमुख यांना सांगितले आहे. त्यांनी आज आसाराम आबुज यांचे बरोबर चर्चा देखील केली.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम ातील तरतुदी प्रमाणे एकही लाभार्थी रेशन मालापासून वंचित राहू नये, ▶▶ उर्वरित पान २ वर

## वाहनांची नवी मालिका येणार पसंती क्रमांकासाठी अर्ज करावे

बीड । प्रतिनिधी

परिवहनेत्र दूचाकी वाहनांसाठी नोंदणी मालिका चक२३इडव्ही सद्यस्थितीत सुरू असून सदर मालिकेतील नोंदणी क्रमांकाचे वाटप संपत आलेले आहे. त्या अनुषंगाने परिवहनेत्तर दुचाकी MH23BM 0001 ते 9999 ही मालिका दिनांक ३० डिसेंबर २०२४ पासून सुरु करण्यात येणार आहे.

ज्या वाहनधारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावायचा असेल त्यांनी आपला विहित नमुन्यातील अर्ज आकर्षक क्रमांकला लागू असलेली फीच्या रकमेचा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बीड यांच्या नावाचा धनादेश डी. डी व आपल्या ओळखपत्राच्या व आधार कार्डच्या साक्षांकीत प्रतिसह दिनांक १७ डिसेंबर २०२४ ते २४ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी २.०० पर्यंत कॅश काउंटर खिडकी क्रमांक २ वर जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व परिवहन आयुक्तांचे परिपत्रिकानुसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची नोटीस दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दुपारी ४.०० वाजता प्रसिद्ध करण्यात येईल. दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी एकपेक्षा जास्त अर्ज असलेल्या अर्जदारांनी दुपारी १.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये मूळ शुल्का व्यतिरिक्त अधिक रकमेचा धनादेश जमा केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता लिलावाची विहित कार्यपद्धती अवलंबून नोंदणी क्रमांकाचे वाटप

▶▶ उर्वरित पान २ वर

## ऊस तोडणी कामगारांना देण्यात येणाऱ्या अग्रीम रक्कम व्यवहाराला कायद्याचे संरक्षण देण्यात यावे: आ.सुरेश धस

### मा राज्यपाल महोदयांच्या अभिभाषा वरील आभार आणि राज्य सरकारचे अभिनंदन प्रस्तावावर बोलताना केली मागणी

आष्टी । प्रतिनिधी

साखर कारखाना व्यवस्थापन ऊसतोड कामगार कामगारांना अग्रीम उचल रक्कम देतात मात्र त्यासाठी वाहतूकदार आणि मुकादम यांना जबाबदार ठरवून त्यांच्याकडून कायदेशीर दस्तऐवज करून घेतात मात्र ऊस तोडणी कामगारातील काही काम गार हे कामाला न जाता अग्रीम रक्कम इतरत्र खर्च करतात ही रक्कम परत मिळवणे सहजासहजी शक्य होत नाही त्यातून अनेक पेज प्रसंग निर्माण होत असल्यामुळे अनेक मुकादमांनी वाहतूकदारांनी आत्महत्या केलेले आहेत त्यामुळे या उचल रकमे च्या व्यवहारास




कायदेशीर संरक्षण मिळावे यासाठी अशासकीय विधेयक मांडणार आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषण वर आभार व्यक्त करताना आणि राज्य सरकारच्या अभिनंदन प्रस्तावा प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना आ.धस म्हणाले की,जेव्हा विरोधकांचे दिल के टूकडे हजार हुये कोई यहा गिरा कोई वहा गीरा अशी अवस्था झाली म्हणून आता त्यांनी जनतेला मारकडवाडी दाखविण्याचे काम केले. लोकसभा निवडणुकीमध्ये ३१ खासदार निवडून आले त्यावेळी त्यांनी ईव्हीएमला आक्षेप घेतला नाही आले मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला त्या वेळी त्यांनी ईव्हीएमला दोष देण्याचे काम सुरू केले आहे हे रडगाणे असून दुर्दैवी असल्याचे सांगत आमदार सुरेश धस यांनी पंतप्रधान नरेंद्र जी मोदी साहेब यांनी पंतप्रधान आवास योजना शहरी आणि ग्रामीण या दोन्हीसाठी घसघशीत वाढ केल्यामुळे गोरगरिबांची घरे तयार होणार असून त्यातून निवारा मिळणार आहे पी एम किसान सन्मान निधी हा शेतकऱ्यांना मोठा आधार असून त्याचा लाभ ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रम ाणावर होत आहे जलजीवन मिशन अंतर्गत ९०% योजना पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झाली असून त्यासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध व्हावा म्हणजे उर्वरित कामे पूर्ण करून लोकांना प्रत्येक घरी नळाद्वारे पाणी मिळणार आहे ही केंद्र आणि राज्य सरकारची मोठी उपलब्ध ठरणार आहे असे सांगत केंद्र आणि राज्य सरकारने आजपर्यंत राबविलेल्या विविध योजना आणि त्याचा सामान्य जनतेला झालेला फायदा याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील जनतेने प्रचंड बहुमताने महायुती सरकारला पसंती दिली असल्याचे सांगत पश्चिम वाहिनीचे पाणी तुटीच्या ▶▶ उर्वरित पान २ वर




## थोडक्यात

### उसाच्या ट्रकची दुचाकीला धडक; एक ठार

गेवराई । प्रतिनिधी




शहरातील बायपास जवळ तलवाडा फाटा येथे उसाच्या ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या नादात एका ट्रकने दुचाकीला दिलेल्या धडकेत १ जण ठार, तर दुसरा जखमी झाल्याची दुर्दैवी घटना धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर घडली आहे. या अपघातातील मृत व्यक्तीचे नाव रमेश मुरलीधर बंग (वय ५८, रा. गेवराई जि. बीड) असे आहे. या घटनेचा संपूर्ण थरार एका व्हिडिओत कैद झाला असून हा व्हिडिओ सोशल मीडियात चांगलाच व्हायरल झाला आहे. घटना रविवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास घडली असून रमेश मुरलीधर बंग असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते ५८ वर्षांचे होते. ते रविवारी अन्य एका व्यक्तीसोबत धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून स्कुटीवरून प्रवास करत होते. त्यावेळी ऊसाच्या ट्रकला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. त्यात रमेश बंग हे ट्रकच्या मागच्या चाकाखाली सापडले. त्यात ते जागीच ठार झाले. रमेश बंग हे गेवराई शहरातील होते. त्यांच्या अपघाती मृत्युची वार्ता शहरात पसरल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल आहे.

### ड्रोन खरेदी अर्थसहाय्य योजनेसाठी आवाहन

बीड । प्रतिनिधी

कृषी क्षेत्रात ड्रोन (मानव विरहीत वायू यान) च्या वापरास पुरेश्या संधी असून सद्य स्थितीत त्याचा विविध पिकांच्या वाढीच्या अवस्थेत कीटक नाशके, सूक्ष्म मुलद्रव्ये, विद्राव्य खते फवारणी या बाबी व्यतिरिक्त कृषी क्षेत्राशी निगडीत इतर कामासाठी देखील वापर करता येऊ शकतो. ड्रोन वापरामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात, वेळेत व श्रमात बचत होऊन रोजगार निर्मिती होऊ शकते.त्यामुळे केंद्र शासन पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान या योजने अंतर्गत ड्रोन या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे. सन २०२४-२५ साठी कृषी यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत ड्रोन खरेदीसाठी अर्थसहाय्य या घटकासाठी १०० ड्रोनचा महाराष्ट्र राज्य साठी वार्षिक कृती आराखडा मंजूर करण्यात आलेला असून त्यासाठी शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था तसेच कृषी व तत्सम पदवीधर लाभार्थी यांना अर्ज करता येतो. कृषि यांत्रिकीकरण - मुख्य घटक - भाडे तत्वावरील सेवा सुविधा केंद्र या घटकामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.त्यामुळे सन २०२४-२४ मध्ये ड्रोन हा घटक ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्यामुळे शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था व कृषी व तत्सम पदवीधर यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashtra.ov.in/Farmer या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत. तसेच अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त अर्ज सादर करून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, , बीड यांनी केले आहे.

### दत्त संस्थान बालाघाटावर गोमाता पूजन व धार्मिक कार्यक्रमाने दत्त जन्मोत्सव साजरा



बीड । प्रतिनिधी

दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथील संस्थांवर परमपूज्य सद्गुरु प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने श्री दत्त जयंती उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. दत्त संस्थांवर संपूर्ण दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये दुपारी बारा वाजता दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला यानंतर महा अभिषेक दत्त व महादेवाला दुग्धाभिषेक करण्यात आला. यानंतर दत्त जन्मानिमि त्त महिलांनी पाळणा गायन केले. याबरोबरच गोमातेला गोग्रास देऊन गोमातेची पूजा करण्यात आली. या दत्त जन्मोत्सवानिमित्त सती अनुसयाची उत्कृष्ट झाकी तयार करण्यात आली होती.या झाकी म ध्ये सती अनुसयाच्या वेशभूषा कु. प्रार्थना अमोल ढास ने सहभाग नोंदविला. या कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

### लहूजी सस्ते यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



गारमाथा (ता.पाटोदा) येथील रहिवाशी लहूजी बापू सस्ते (वय ९०) यांचे वृध्दापकाळाने दि.१७ डिसेंबर रोजी रात्री निधन झाले. लहूजी बापू सस्ते हे धार्मिक होते. गावच्या कोणत्याही कार्यक्रमात त्यांची उपस्थिती असायची. शिवाय सर्वांशी प्रेमाचे संबंध त्यांचे होते. जुण्या काळातील धार्मीक विचार घेवून ते आयुष्य जगले. मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. गारमाथा येथील राहत्या घरी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. मंगळवारी सकाळी दहा वाजता गारमाथा येथील स्वतच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य ॲड. प्रकाश कवठेकर, पंचायत समिती उपसभापती देवीदास शेंडगे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. लहूजी बापु सस्ते हे मुकादम आबा सस्ते यांचे वडिल होत.